**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - साईनाथ रंगराव महेकर
वय - २२ वर्षे
व्यवसाय - नोकरी जवान
रा/ने - निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ जि. सिंधुदूर्ग.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. २१/०१/२०२५ रोजी माझी नेमणूक निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क कुडाळ क्र. ३ या कार्यालयात होती. सदर दिवशी सकाळी ११.४० वा. निरिक्षक साहेब यांना बातमी मिळाली की, मौजे देवबाग सांताक्रुझवाडी येथे इरमित लुद्रीक हिच्या यांच्या राहत्या घराच्या मोकळया जागेत अवैधरित्या गोवा बनावटीच्या दारु विक्रीचा व्यवसाय सुरु आहे. म्हणून दुपारी ११.४५ वा. मी, दुय्यम निरिक्षक वंजारी मॅडम, पंच व इतर स्टॉफ असे मौजे देवबाग सांताक्रुझवाडी येथे खाजगी वाहनाने गेलो. तेथे इरमित लुद्रीक हिच्या घराच्या मागील मोकळया जागेत छापा टाकला असता त्या ठिकाणी एक महिला हातामध्ये कापडी पिशवी घेवून संशयास्पदरित्या दिसून आली. म्हणून मॅडमनी त्याला थांबवून त्या पिशवीमध्ये काय आहे याची विचारणा केली असता त्याने घाबरत नॅशनल रॉयल ब्रन्ड सिलबंद बाटल्या असल्याचे सांगितले. म्हणून मॅडमने त्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीच्या नॅशनल रॉयलज ब्रॅन्डच्या १८० मिली मापाच्या ३२ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. मॅडमनी तिचे नाव गाव विचारले असता तिने आपले नाव इरमित रेमेत लुद्रीक्स वय ६० वर्षे रा. देवबाग सांताक्रुझवाडी घर क्र. ३५२ असे सांगितले. मिळालेल्या मुद्देमालातून नमूना प्रथकरणासाठी दोन सिलबंद बाटल्या कार्यालयीन पितळी मोहर उमठवून सिलबंद केल्या. उर्वरित मुद्देमाल सिलबंद करुन आपल्या ताब्यात घेतला. मी कार्यालयात येवून आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. साक्षीदारास दि. २१/०१/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१</u>** दिली आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. ती आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञा श्रीमती आर.ए.मोंडकर यांचेमार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या ठिकाणी छापा टाकला त्या जागेची खात्री करण्यासाठी त्या मालकाची प्रॉपर्टीकार्ड किंवा ७/१२ पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की,

आम्हाला मुद्देमाल मोकळया जागेमध्ये सापडला. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये नमूद पंच हे आमचे नेहमीचे पंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळापासून कुडाळ ४५ किलोमिटर अंतरवर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने आम्ही छापा टाकण्यासाठी गेलो त्या वाहनाचा प्रकार व नंबर फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसे नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, स्थानिक पंच का उपलब्ध नाहीत हे पण नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कथीत जप्त मुद्देमालाचे उत्पादन वर्ष, बॅच नंबर सिरियल नंबर फिर्यादमध्ये नमूद नाही व तसे नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मिळालेल्या बातमीची खात्री करण्यास बोगस ग्राहक पाठवून खात्री केली नव्हती. तसेच तशी खात्री करण्यास आम्हाला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कथीत मुद्देमाल आजरोजी न्यायालयात नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, देवबाग सांताक्रुझवाडी हा लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमालापैकी ज्या दोन बाटल्या प्रत्यंतरासाठी काढल्या त्याचा वेगळा पंचनामा करण्यात आलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीच्या ताब्यातून आम्ही मुद्देमाल जप्त् केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, निव्वळ केसेचा कोटा पुर्ण करण्याकरीता आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. १०-१२-२०२५

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.